**भविष्य-निर्वाह निधीच्या रकमेतून शासनाला येणे रकमा/शासन नुकसान यांची वसूली न करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः-प्रानिमं-२००५/४८६/प्र.क्र.०४/०६/१३अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांकः- २३ जानेवारी, २००६.

**परिपत्रक**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ मधील नियम २५ (२) खालील टीप (१) व टीप (३) येथे अनुक्रमे "शासनाला देय रकमांची वसूली आणि भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान यांची सरमिसळ करू नये." तसेच "शासकीय कर्मचा-याने अफरातफर केलेली रक्कम त्याच्या भविष्य निर्वाह निधीतून वळती करण्यात येऊ नये." अशा स्पष्ट तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, जरी एखादया सेवानिवृत्त वर्गणीदाराकडून शासनास देय असलेल्या रकमा येणे बाकी असल्यास व वर्गणीदारास सेवानिवृतीनंतरच्या लाभाच्या सर्व अनुज्ञेय रकमा जरी प्रदान करण्यात आलेल्या असल्या तरीही अशा परिस्थितीत संबंधित वर्गणीदाराकडून भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानाच्या रकमेतून शासनास देय असलेल्या रकमांची वसूली करता येत नाही. असे असतानाही नियमातील सदरहू तरतूदींचे संबंधितांकडून काटेकोरपणे पालन होत नसल्याचे व त्यामुळे या संदर्भात बरेच तक्रार अर्ज मा. लोकआयुक्त यांच्या कार्यालयाकडे प्राप्त होत असल्याचे त्या कार्यालयाने शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

२. सबब वरीलप्रमाणे अनियमितता टाळण्याकरिता असे आदेश देण्यात येत आहेत की, महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या नियम २५ (२) खालील टीप (१) व (३) चे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सेवानिवृत्त होणा-या वर्गणीदारांकडून त्याच्या भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानाच्या रकमेतून शासनास येणे असलेल्या कोणत्याही प्रकारच्या रकमांची वसूली करण्यात येऊ नये. वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्याने सेवानिवृत्त वर्गणीदारास भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानाची रक्कम मिळण्यास विलंब झाल्यास त्या विलंबास जबाबदार असणा-या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरूध्द योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. दळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई, (कृ.मा.प.)

C:\lotus\work\wordpro cr 4/06

ROTA | H 1442 (3000-1-06) 1

सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई,
महालेखापाल( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र,नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र , नागपूर,,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र , नागपूर,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक,उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा विभाग, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र यांचे कार्यालय, भविष्य निर्वाह निधी शाखा जुनी सी.जी.ओ.बिल्डींग, न्यू मरीन लाईन्स, १०१ महर्षि कर्वे रोड, मुंबई-४०० ०२० (५० जादा प्रतीसह)
संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* **पत्राने**

C:\lotus\work\wordpro cr 4/06
H 1442-1 भ